# विपश्यना

साधक (मराठी)

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. ३०/-
आजीवन शुल्क रु. ५००/-

बुद्धवर्ष २५६२, कार्तिक पौर्णिमा, २३ नोव्हेंबर, २०१८ वर्ष २ अंक ६/७/८

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहा: http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


## धम्मवाणी

**न जच्चा वसलो होति, न जच्चा होति ब्राह्मणो।**
**कम्मुना वसलो होति, कम्मुना होति ब्राह्मणो॥**

*सुत्तनिपातपालि-वसलसुत्तं-142.*

न कोणी जन्माने वृषल (चांडाळ) असतो, ना ही जन्माने ब्राह्मण. कर्मामुळेच कोणी वृषल होतो, कर्मामुळेच ब्राह्मण.

## विपश्यना साधनेच्या सुवर्ण जयंतीनिमित्त धर्म प्रसार आणि पूज्य गुरुजींच्या प्रति कृतज्ञता प्रकटण्याची सुसंधी

३ जुलै १९६९ ला विपश्यना साधनेचे पहिले शिबिर मुंबईत लागले. याच्या पुनरुत्थानाचा ५० वा वाढदिवस अर्थात ३ जुलै २०१८ पासून २ जुलै २०१९ पर्यंत वर्षभर ग्लोबल विपश्यना पगोडामध्ये दररोज एक दिवसाचे शिबिर नियमितपणे घेतले जाईल, ज्याने हे वर्ष साधकांची दैनिक साधना पुष्ट करण्यास सहायक ठरेल. ज्या कोणा साधक–साधिकांना ज्या दिवशी वेळ मिळेल तेव्हा ह्या शिबिरांचा ते लाभ घेऊ शकतील. त्यामुळे साधकांच्या साधनेमध्ये निरंतरता, नियमितता तर येईलच आणि त्यांच्यापासून प्रेरणा प्राप्त करुन अधिकाधिक लोकात सद्धर्मासंबंधी जागरुकता उत्पन्न होईल आणि शिबिरात सामील होऊन ते आपले कल्याण करु शकतील. इतर ठिकाणीसुद्धा लोक अशा प्रकारे दैनंदिन साधना, सामुहिक साधना तसेच एक दिवसीय शिबिरांद्वारे या विद्येचा व्यावहारिक अभ्यास पुष्ट करोत, हीच पूज्य गुरुदेवांप्रती खरी श्रद्धांजली आणि कृतज्ञता असेल.

विश्व विपश्यनाचार्य पूज्य श्री. सत्यनारायण गोयन्काजींच्या शुद्ध धर्माच्या संपर्कात येण्यापूर्वीच्या या घटनांनी आणि बालपण ते तरुणपणापर्यंतच्या त्यांच्या भक्तीभावाने कोणताही भ्रम निर्माण होऊ नये. उलट अशी प्रेरणा मिळो की असा व्यक्ती सुद्धा कशा प्रकारे बदलू शकतो, याच उद्देशाने त्यांच्या संक्षिप्त जीवन परिचयाची ही **तिसरी शृंखला:–**


### कृष्णावर असीम श्रद्धा

क्रमश: (मागील अंकापासून पुढे) ...

व्यापार क्षेत्रात प्रथम 'मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स'चा अध्यक्ष झालो. नंतर बर्मी नागरीक झाल्यानंतर 'रंगून चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज'चाही अध्यक्ष झालो. ऊ नू सरकारचे व्यापारमंत्री ऊ औं च्या मंत्रालयात व्यापारासंबंधी सल्लागार म्हणूनही माझी निवड झाली.

व्यापारात यश मिळवित असतांना मी माझ्या परिवाराच्या अनेक औद्योगिक प्रतिष्ठानांची स्थापना केली. त्यात अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले. सरकारशी नेहमीच चांगले संबंध टिकून राहिल्यामुळे ऊ नू सरकारमध्येच नाही तर लष्करी राजवटीच्या वेळीसुद्धा दोनदा सरकारी प्रतिनिधी मंडळाबरोबर परदेशात गेलो आणि तेथे महत्त्वपूर्ण परिणाम प्राप्त केले.

या सर्व अविश्वसनीय यशाचे श्रेय मी माझ्या इष्ट देवालाच देत राहिलो. बालपणी जे चित्र माझ्या खिशात ठेवले ते परदेशात प्रवास करत असतांनाही सदैव माझ्या खिशात ठेवत होतो. माझ्या मनावर गीता प्रेस गोरखपूरच्या तरल भक्तीचा गाढ प्रभाव होता. मी माझ्या इष्ट देवाचे चित्र समोर ठेवून दररोज सकाळी अर्धा तास अश्रुपूर्ण डोळ्यांनी प्रार्थना करत होतो आणि सदैव भक्तिरसात आकंठ गढून जात होतो. माझे ईश्वर श्रीकृष्णाची गहन भक्ती मला पदोपरी मदत करीत आहे हा दृढ विश्वास अधिक दृढ होत गेला.



*पूज्य श्री गोयन्काजी व पूज्य माताजी धम्मगिरीच्या धम्मकक्षामध्ये बसलेले.*

बालपणी तिसरी ते दहावी इयत्तेपर्यंत स्थानिक खालसा शाळेत शिक्षण घेत होतो. तेथे गुरुवाणीचासुद्धा मनावर खोल प्रभाव पडला; यापेक्षा जास्त प्रभाव आर्य समाजाच्या शिक्षणाने पडला. त्याचे भवन आमच्या अगदी घराजवळच होते. त्या प्रभावामुळे मी सगुण-साकारची भक्ती सोडून निर्गुण-निराकाराकडे मुळीच वळलो नाही. कारण मी त्याला भक्ती करण्यास योग्य समजत नव्हतो. परंतु आर्य समाजाच्या इतर अनेक मान्यतांचा माझ्या मनावर खूप खोल प्रभाव पडला.

त्या किशोर वयातच समाजातील अनेक कु-प्रथांना दूर करण्याची प्रबळ इच्छा जागृत झाली. त्यापैकी ज्याचा सर्वात खोल प्रभाव पडला तो होता - जन्माच्या आधारावर लोकांना उच्च किंवा नीच जातीचा मानणे. याचे मला फार वाईट वाटत असे. म्हणून अति उत्साहाच्या भरात आर्य समाज मंदिरात कनिष्ठ जातीतील काही लोकांना यज्ञोपवीत घातले आणि त्यांना उच्च जातीचे घोषित केले. परंतु अनुभवहीन उत्साहात केलेला माझा प्रयत्न पूर्णपणे असफल झाला. सुदृढ सामाजिक परंपरेमुळे ते सर्व आपल्या पूर्वस्थितीत परतले. मी पुन्हा प्रयत्न केला, पण लाचारी होती. पुरातनवादी समाजाची व्यवस्था एवढी कठोर होती की त्यात काही सुधारणा करायला जागाच नव्हती.

अशाच प्रकारे नवयुवावस्थेमध्येच समाजात होणाऱ्या एका वृद्ध-विवाहाला कडाडून विरोध केला. माझ्या एका तरुण मित्राच्या पत्नीचे निधन झाले. त्याच दिवसात समाजातील एक कमी वयाची बालिका विवाह होताच विधवा झाली. आम्ही युवकांनी मिळून आंदोलन केले आणि विधुर मित्राला त्या बाल-विधवेशी विवाह करण्यास प्रवृत्त केले. आमच्या दबावामुळे तो तयार तर झाला पण त्यामुळे समाजात मोठी खळबळ माजली. माझ्या विधुर मित्राच्या वडिलांनी गंगा (इरावती) नदीत बुडून जीव देण्याची धमकी दिली. त्याचा परिणाम म्हणून हा विवाह होऊ शकला नाही.

या कारणांनी समाजात मला सर्वमान्य नियमांचा विरोध करणारा मानू लागले. या भिन्न-भिन्न प्रयत्नांच्या असफलतेमुळे मी समाजातील श्रेष्ठ

पुढाऱ्यांच्या नजरेतून उतरलो.

तरीही माझ्यावर आर्य समाजाचा प्रभाव प्रबळ होत गेला आणि सुधारक प्रवृत्ती बलवान होत गेली. माझे दोन्ही मोठे भाऊ बालकृष्ण आणि बाबूलालचा विवाह जवळजवळ पंधराव्या वर्षीच झाला, जो शारदा ॲक्ट (बालविवाह निषेध अधिनियम, १९२९) नुसार अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर करावयास हवा होता. जेव्हा माझी पाळी आली तेव्हा मी या गोष्टीवर अडून बसलो की माझा विवाह अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतरच केला जावा. घरातील लोकांना आणि समाजाला माझा निर्णय मान्य नव्हता. पण एक सुखद संयोग असा झाला की भारतातून आलेला एक प्रसिद्ध ज्योतिषी शेजारच्या आर्य समाज भवनात काही दिवसांसाठी मुक्कामी होता. त्याने माझी हस्तरेषा पाहून सांगितले की माझे आयुष्य दीर्घ असेल, परंतु अठरा वर्षाच्या आसपास मृत्यूचा धोका आहे. हे ऐकून मी खूप आनंदित झालो आणि त्याला माझ्या घरी घेऊन गेलो. त्याने अनेकांच्या हस्तरेषा पाहिल्या आणि आपले विचार व्यक्त केले. माझी पाळी आल्यावर त्याने त्याच गोष्टीची पुनरावृत्ती केली की अठरा वर्षे होता-होता मृत्यूचा धोका आहे. माझे काम झाले. मी माझ्या आईस सांगितले की मी अठरा वर्षाचा होण्यापूर्वी कोण्या निष्पाप मुलीचा विवाह माझ्याशी केला गेला तर तिचे भविष्य दुःखाने भरून जाईल. आई फार दयाळू होती. तिने माझ्या सांगण्याचे समर्थन केले की अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतरच माझा विवाह केला जाईल.

माझ्या विद्रोही स्वभावाची आणखी एक घटना. दोन्ही मोठ्या बंधूंचा विवाह पंधराव्या वर्षीच झाला होता. मी जेव्हा पंधरा वर्षाचा झालो तेव्हा परिवारातील वंशपरंपरागत पुरोहिताचे दुराचरण समाजात कुविख्यात झाले. मी या गोष्टीवर अडून बसलो की कोण्या दुराचारी व्यक्तीला मी माझा गुरु करणार नाही. वडिलांनी घरातील मंदिरात दररोज पूजा-अर्चा करण्यासाठी एका पुरोहिताला नियुक्त केले होते. आता त्याच्या हातून यज्ञोपवीत घेण्याचा दबाव पडू लागला. परंतु थोड्या दिवसातच त्याच्या दुराचाराच्या सत्य घटना समोर आल्या आणि मी परत त्याच्या हातून यज्ञोपवीत घेण्यास तयार झालो नाही. त्या वेळी फार मोठा दबाव पडल्यानंतर मी असा प्रस्थाव ठेवला की आर्य समाजाचे तत्कालीन चरित्रवान व्यक्ती पंडित मंगलदेवजी शास्त्रींना माझा गुरु म्हणून स्वीकार करु शकतो आणि त्यांच्या हातून उपनयन संस्कार करवून घेऊ शकतो. पण त्या दिवसात मांडलेमध्ये आर्य समाजी आणि सनातनी हिंदूमध्ये फार मोठा मतभेद होता. त्याचा परिणाम म्हणून तणावसुद्धा होता. घरातील माणसे कट्टर सनातनी असल्याने माझा हा प्रस्थाव स्वीकारु शकले नाहीत. म्हणून मी यज्ञोपवीत धारण न करताच राहिलो. त्यानंतर मी आजपर्यंत यज्ञोपवीत घेऊ शकलो नाही. विचार करतो की जे झाले ते चांगलेच झाले.

त्याच दिवसात माझ्या मनात विद्रोहाची एक प्रबळ ठिणगी पडली. तेव्हा माझा विश्वास नव्हता की ती इतक्या लवकर एवढ्या प्रबळ अग्नीचे रूप धारण करेल.

आर्य समाजापासून गंभीरतापूर्वक प्रभावित झाल्यानंतर त्यांच्या समाजसुधारणाच्या गोष्टी मी मान्य केल्या होत्या; परंतु सगुण-साकारच्या भक्तीत गढून गेलेले माझे मन निर्गुण-निराकार भक्तीकडे जाऊ शकले नाही. माझ्या लक्षातच येत नव्हते की निर्गुण-निराकाराची भक्ती कशी करू शकतो.

अनेक असफलता मिळाल्यानंतरही श्रीकृष्णावर असलेल्या माझ्या भक्तीला जराशीसुद्धा झळ लागली नाही. दररोज सकाळी भाव-मधुर भक्तीचे गीत गात होतो व त्याबरोबर भगवद्गीतेचा अभ्यासही करीत होतो. मी वाचले की महाभारतात नातलगांचे जे आपसात युद्ध झाले त्यात देशातील अगणित योद्धे मारले गेले आणि अनेक दुर्लभ अस्त्र-शस्त्रास्त्रे नष्ट झाली. मी याला चांगले कसे म्हणेन? पण माझ्या इष्टदेवाने गीतेत स्थित प्रज्ञतेची जी व्याख्या केली आहे ती मला खूप पसंत पडली आणि तिला जीवनात उतरवण्याची प्रबळ इच्छा जागृत झाली.

याच गीतेत वाचले की चातुर्वर्ण्याची व्यवस्था त्यांच्या गुण, कर्म आणि स्वभावाच्या आधारावर माझ्या इष्ट देवाकडून केली गेली -

**चातुर्वर्ण्य मया. सृष्टं गुणकर्मविभागशः।**
**तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्।। ...** गीता 4/13

"चार वर्णांची सृष्टी माझ्या द्वारे गुण, कर्म आणि आचरणाच्या आधारे केली गेली. असे होऊन सुद्धा मला, अविनाशी कर्त्याला अकर्त्याच्या रूपातच जाणा."

ही गुण, कर्म स्वभावाची वर्णव्यवस्था जन्माच्या आधारावर कशी बदलली? कसे एका निर्दोष व्यवस्थेला काही लोकांनी स्वतःसाठी आणि स्वतःच्या भावी संततीसाठी 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथाची रचना करून तिला बदलून टाकले. या बदलामुळे कनिष्ठ जातीवर उच्च वर्गाकडून जो अत्याचार झाला तो पाहून म्यंमामध्ये राहत असूनही दुःखी राहत होतो. आता भारतात येऊन या जातीची तीच दुर्दशा पाहिली तेव्हा विद्रोहाचा भाव जागृत झाला की माझ्या इष्ट ईश्वराने जी सुंदर आणि निर्दोष वर्णव्यवस्था स्थापली होती तिला जातीचा अहंकार घेऊन एवढे दूषित कसे केले? केले हे तर सत्य आहेच; परंतु मी विचार करू लागतो की माझा इष्टदेव तर श्रेष्ठ परमेश्वर आहे. सर्वशक्तिमान आहे. तो हा दोष का सुधारू शकला नाही? ज्यांनी आपल्या स्वार्थासाठी पुरातन निरोगी व्यवस्था दूषित केली त्यांना कठोराहून कठोर शिक्षा का दिली नाही?

मी विद्यार्थी जीवनापासून पाहत होतो की उच्च-नीच आणि स्पृश्य-अस्पृश्याची ही समाजविरोधी प्रथा किती तीव्र होत चालली आहे. माझ्या वर्गात गुरुचरण सिंह नावाचा एक वर्गमित्र होता. तो भंगीपुत्र होता. तो माझ्या शेजारी एकाच बाकावर बसत असे. माझ्या समाजातील इतर विद्यार्थ्यांना ते आवडत नव्हते. जेवणाच्या वेळी आम्ही दोघे आपापल्या घरून आणलेले भोजन त्याच बाकावर शेजारी बसून खात होतो. त्याचे भोजन मी कधीही खाल्ले नाही. तरीही एका अस्पृश्य जातीच्या विद्यार्थ्याबरोबर एकाच बाकावर बसून भोजन करणे माझ्या अनेक विद्यार्थी बांधवांना मुळीच आवडत नव्हते. ते बाहेर समाजात या बाबतीत चर्चा करीत व माझी निंदा करीत असत.

मला समजत नव्हते की कोण्या एका परिवारात केवळ जन्म घेतल्याने कोणी व्यक्ती कितीही सच्चरित्र असली तरी अस्पृश्य मानली जाते आणि कोण्या अन्य परिवारात केवळ जन्म घेतल्याने कोणी व्यक्ती उच्च जातीची मानली जाते, मग ती कितीही दुश्चरित्र का असेना. ही परीस्थिती माझ्या मनाला थोडीसुद्धा आवडत नव्हती. माझ्या शाळेतील जीवनातच नाही तर पुढे जाऊनसुद्धा ही दूषित स्थिती पाहून मी काहीही करु शकत नव्हतो. परंतु दुःखीच राहत होतो. जेव्हा-जेव्हा मी माझ्या वडीलधाऱ्यांबरोबर रेल्वेचा प्रवास करत असे तेव्हा पाहत असे की जेव्हा आम्ही घरून आणलेले भोजन करण्यासाठी बसत होतो आणि त्याच बाकावर कोणी सुसंस्कृत बर्मी बंधू बसलेला असेल तर त्याला आम्ही सांगत असू की तुम्ही जरा थोड्या वेळासाठी उठा, नाही तर आम्ही भोजन करु शकणार नाही. मी माझ्या वर्गमित्राबरोबर एकाच बाकावर बसून भोजन करत असे आणि येथे माझे वडीलधारी भोजन करण्यासाठी एका सुसंस्कृत बर्मी बंधूला नीच जातीचा समजून भोजनाच्या वेळी जागेवरुन उठवित असत. माझ्या मनाला खूप वाईट वाटत असे. परंतु काय करणार? म्यंमाहून भारतात आल्यानंतर चुरु नगरात राहतांना देखील मी उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य ही अत्यंत अप्रिय पातळी पाहिली. हे सर्व बघून माझी आपल्या ईश्वर श्रीकृष्णावर प्रगाढ भक्ती आणि श्रद्धा असूनही केव्हा-केव्हा मनात विद्रोहाचा भाव जागृत असे की ज्या ईश्वराने एक सुंदर वर्णव्यवस्था स्थापित केली ती बिघडलेली पाहून तिला सुधारण्यासाठी त्याने कोणती कठोर पावले उचलली नाहीत?

मी विचार करीत असे की आम्ही ब्राह्मण व बनियांच्या घरी जन्म घेतला म्हणून श्रेष्ठ आहोत आणि जे तथाकथित नीच जातीत जन्मले त्यांच्यावर किती अत्याचार करतो. हे सर्व पाहून माझ्या मनात इष्ट देवावर भक्ती आणि श्रद्धा असूनही केव्हा-केव्हा माझा विद्रोही स्वभाव जागृत असे. त्या दिवसातील माझी एक जुनी कविता मला आजही आठवते –

**ब्राह्मण बनिये के घर जन्मे, इससे ही क्या हम हैं महान?**
**हम उच्च वर्ण, हम सर्वश्रेष्ठ, ऊंचा समाज में बना स्थान।।**

माझी विचित्र स्थिती होती. एकीकडे आपल्या इष्ट देवावर गाढ श्रद्धा आणि दुसरीकडे त्याच्याविषयी गाढ विद्रोह – हे दोन्ही भाव मनात बरोबर चालत राहिले.

## द्रवलेली भक्ती

माझा जन्म आणि पालनपोषण अशा आई-वडिलांच्या घरी झाले; जे गीताप्रेस गोरखपूरच्या भक्तिमार्गाचे परम श्रद्धाळू वाटसरु होते. बालपणापासून मोहन शिक्षकासारख्या (मदन मोहन शर्मा) गुरुच्या संपर्कात आलो, जे म्यंमामध्ये गीताप्रेसने प्रकाशित केलेल्या साहित्याचे निःस्वार्थ प्रचारक होते.

स्वतः मोठे भावूक भक्त होते. भक्तीचे भजन गात असतांना त्यांचे हृदय व्याकुळ होत असे आणि डोळ्यातून अश्रुधारा वाहत असत. मी सुद्धा बालपणापासूनच स्वभावाने खूप भावूक होतो. म्हणून आपल्या गुरुच्या प्रभावामुळे मी सुद्धा सगुण-साकारच्या भक्तीत प्रभावित होऊन बहुतेक वेळा रडत असे. मला खूप आठवतय की जवळ-जवळ सातव्या वर्षी मी जेव्हा गीताप्रेसने प्रकाशित केलेली 'भक्त बालक' किंवा 'भक्त नारी' यांसारखी पुस्तके माझ्या आईला वाचून ऐकवित असे, तेव्हा मी बहुतेकवेळा द्रवीभूत होत असे. डोळ्यातून अश्रुधारा वाहत असत. मी पाहतो की भक्तिभावाने भरलेल्या त्या कथा ऐकत असतांना माझ्या आईच्या डोळ्यातूनसुद्धा अश्रु वाहत असत आणि ती अनेक वेळा मला कुशीत घेऊन छातीशी धरत असे. मी म्हणत असे – "आई, मी ध्रुव होईन." ती म्हणत असे, "हो बेटा, तू ध्रुव होशील" या द्रवलेल्या भक्तीत मी अनेक वर्षे निमग्न राहिलो.

वडील शिवभक्त होते म्हणून शिव माझे उपास्य देव झाले. आी कृष्ण भक्त होती म्हणून कृष्णसुद्धा माझे उपास्य देव झाले. माझ्या बाबांचा बुद्धाकडे खूप कल होता. ते मांडलेच्या सत्यनारायण मंदिरात जावो अगर न जावो; परंतु प्रत्येक आठवड्यात कमीतकमी एकदा मांडलेच्या उपनगरात 'सांजू' मध्ये असलेल्या पुरातन ऐतिहासिक महामुनि मंदिरात अवश्य जात असत. मी सुद्धा त्यांच्याबरोबर जात असे. त्या भव्य मंदिरात भगवान बुद्धांच्या मूर्तीचा शांत ध्यान-मग्न चेहरा मला खूप आकर्षक वाटत असे. मी त्यांच्याकडे पुष्कळ वेळपर्यंत टक लावून पाहत असे. मंदिराच्या विशाल पटांगणात भक्तांची गर्दी असूनही स्वच्छता आणि नीरव शांततेचे वातावरण होते; हे माझ्या बालमनाला खूप आवडत असे. बाबा त्या शांत वातावरणात पुष्कळ वेळपर्यंत डोळे बंद करुन मांडी घालून मौन बसत असत. मला माहीत नाही की ते कोणत्या प्रकारचे ध्यान करीत असत की मंदिरातील नीरव शांतीचा मौन रसस्वाद घेत असत. बहुतेक वेळा मी सुद्धा त्यांच्याजवळ मांडी घालून बसत असे. मला हे फार आवडत असे. आता भगवान शिव आणि श्रीकृष्णाबरोबर भगवान बुद्धसुद्धा माझे उपास्य झाले. आमच्या घरातील देवघरात रवि वर्माने तयार केलेली मोठ्यात मोठ्या आकाराची दोन चित्र लावलेली होती. ती भगवान शिव आणि श्रीकृष्णाची होती. परंतु बुद्धावरील माझी श्रद्धा-भक्ती महामुनी मंदिरात वारंवार जाऊन पुष्ट करीत होतो.

### महादेवजी नाथानी

माझे एक मेव्हणे होते - महादेवजी नाथानी. ते परिवाराच्या व्यापारी प्रतिष्ठानात हिशेबाच्या वह्या लिहिण्याचे काम करत असत. ते माझ्या सर्वात मोठ्या बहिणीचे पती होते. वयाने माझ्यापेक्षा जवळ-जवळ वीस वर्षे मोठे होते. त्यांचे जीवन अत्यंत धार्मिक आणि सात्विक होते. त्यागाने परिपूर्ण होते. त्यांची आदर्श जीवनचर्चा मला खूप प्रेरित करीत असे. ते संस्कृतचे प्रकांड पंडित होते. मी बघायचो की केव्हा-केव्हा एखादा संस्कृत पंडित एखाद्या ग्रंथाच्या एखाद्या भागाविषयी त्यांच्याशी खूप वेळपर्यंत चर्चा करीत असे. सर्व त्यांच्या विद्वतेचा आदर करत असत.

मी त्या लहान वयातच विष्णुसहस्त्रनाम, गोपालसहस्त्रनाम, शिव-महिम्न स्तोत्र, शिव-तांडव स्तोत्र आणि श्रीमद् भागवत गीतेचा पाठ करणे शिकू लागलो होतो. ते बहुधा माझ्या संस्कृत उच्चारांना सुधारत असत. ते मला आवडत असे. त्यांच्या वाणीत खूप सामर्थ्य होते. जेव्हा ते स्वतः रुद्रचा पाठ करीत तेव्हा सगळे वायुमंडळ जणू काही मृदंगाच्या आवाजाने गुंजत असे.

मी जेव्हा बाबाबरोबर महामुनी मंदिरात जाऊन येत असे तेव्हा पुष्कळ वेळा ते मला समजावयाचे की बुद्ध भगवान विष्णुचे नववे अवतार आहेत, म्हणून ते आम्हाला पूजनीय आहेत. त्यांच्या मंदिरात जाऊन नमस्कार करण्यात कोणताच दोष नाही. पण इकडे लक्ष असू दे की चुकूनसुद्धा त्यांच्या उपदेशात अडकून पडू नकोस. त्यांचा उपदेश ग्रहण करण्यास योग्य नाही. भगवान विष्णूने बुद्धाच्या रुपात अशासाठी अवतार घेतला होता की ते दुष्ट लोकांना फसवून त्यांना असा उपदेश देतील की ज्यामुळे ते मृत्यू पावल्यानंतर स्वर्गात न जाता नरकात जातील. यासंबंधी कोण्या शास्त्रातील श्लोकसुद्धा वाचून ऐकवित असत. आता असे वाटते की ते श्लोक निश्चितच विष्णुपुराणातीलच असतील. माझा त्यांच्याशी काही संबंध नव्हता आणि त्या बाल्यावस्थेत मी एवढा विचार करण्या आणि समजण्यालायक नव्हतो की कोणालाही चुकीच्या मार्गाने घेऊन जाण्यासाठी ईश्वराचा अवतार का होतो? परंतु मेव्हण्याविषयी श्रद्धा आणि आदराचा भाव असल्याने त्यांची ही गोष्ट मनात खोल रुजली की बुद्ध आम्हाला पूजनीय जरुर आहेत; परंतु त्यांचा उपदेश पूर्णपणे अग्राह्य आहे.

क्रमशः .....

## पालिताना (गुजरात) येथे विपश्यना परिचय व आनापान सत्र

धम्मपाली विपश्यना केंद्राजवळ पालिताना येथे दिनांक ६, ७, ८ ऑगस्ट २०१८ ला धर्मचेतनेचे एक मंगलमयी सत्र संपन्न झाले. यात आसपासची तसेच दूरच्या ठिकाणची जवळजवळ १००० ते १२०० लोक रोज येत राहिली आणि त्यांनी विपश्यना परिचय तसेच आनापान ध्यानाचा लाभ घेतला. जवळपास सर्वच जण विपश्यनेच्या दहा दिवसाच्या शिबिरात भाग घेण्यास उत्सुक झाले. सर्वांनी अशा सत्राचे आयोजन ठिकठिकाणी करावे अशी इच्छा व्यक्त केली. काही जणांनी 'धम्मपाली' मध्ये होणाऱ्या पुढील शिबिरात येण्यासाठी आवेदन-पत्र सुद्धा भरली. तेथील गच्छाधिपती आचार्य महाराजांनी स्वतः शिबिरात बसण्याची इच्छा व्यक्त केली तसेच सर्व श्रावकांना शिबिर करण्यासाठी प्रोत्साहित केले, प्रेरणा दिली.

## केरळातील पुराचा प्रभाव विपश्यना केंद्रावरही

धम्मकेतन, चेंगन्नूर विपश्यना केंद्राची मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. जून्या बिल्डिंग सोबत नवीन स्वयंपाक घर, भोजनालय, महिला निवास इत्यादी सर्वांची हानी झाली आहे. सर्व प्रकारचे सामान, वीजेची उपकरणे, गाद्या, भोजन-सामुग्री इत्यादी सर्व खराब झाले आहे. सर्व काही नव्याने बनवावे लागणार आहे, ज्यासाठी पर्याप्त धन लागणार आहे. ते मिळाल्यावर सुद्धा शिबिर सुरु करण्यासाठी बरेच दिवस लागतील. मदतीसाठी **संपर्क :** श्री रघुनाथ कुरुप, **नाव**: केरळ विपश्यना समिति, **बैंक**: सेंट्रल बैंक ऑफ इंडिया, Kol-lakadavu, A/c. No. 3553134716, IFSC: CBIN0280953. जर कोणाला 80-G अंतर्गत आयकर सूट पाहिजे असेल तर कृपया केरळ विपश्यना केंद्रासाठी पाठवितांना पुढील खात्यावर पाठवावे : - VIPASSANA MEDITATION CENTRE, State Bank of India,, A/c. no. 34241713833 , IFSC SBIN0012931.

### अतिरिक्त उत्तरदायित्त्व

1. श्री सत्यपाल शर्मा, धम्ममरुधर, जोधपुरच्या 'कार्यवाहक' केंद्र-आचार्यांच्या रूपाने सेवा
2. श्री उत्तमराव पाटील, धुळे; धम्मसरोवर केंद्राच्या केंद्र-आचार्यांच्या रूपाने सेवा.
3. श्रीमती नीरा कपूर (स.आ.) धम्मसोत वि. केंद्र-आचार्यांची सहायता.
4. श्रीमती प्रगति ठुब्रीकर, (व.स.आ.) धम्मनाग वि. केंद्र-आचार्यांची सहायता सेवा

### नवे उत्तरदायित्व
### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्री बसंतलाल पटेल, धम्मबल विपश्यना केंद्राच्या केंद्र-आचार्यांची सहायता सेवा
2. श्री विक्रम आदित्य, धम्मसोत विपश्यना केंद्राच्या केंद्र-आचार्यांची सहायता सेवा
3. श्री आर.आर. रामकृष्णनन, धम्मकांची, (त. ना.) च्या केंद्र-आचार्यांची सहायता सेवा
4. श्री वामन बैंगाने, नागपूर
5. श्री हिरामण राजपूत, धुळे
6. श्री भारत प्रसाद मिश्रा, मुजफ्फरपुर (बिहार)

### नव नियुक्ती
### सहायक आचार्य

1. श्री धेंडुप डी. लामा, सिक्किम
2. श्री चंद्रकांत गनेडीवाल, येवतमाळ
3. श्रीमती वंदना गवळी, नागपूर
4. श्री विवेक पाल, नई दिल्ली
5. श्रीमती वीना भिवापुरकर, नागपूर
6. श्रीमती वंदना वर्मा, दिल्ली
7. श्री. रोहिताश्व राहुल नागपाल, शाहजहाँपुर, उ. प्र.
8. श्री. राजेंद्र कुमार मेहता, गुड़गांव, हरियाणा
9. श्रीमती अंजली शरना, दिल्ली
10-11. श्री. सत्यजीत ठाकुर एवं श्रीमती जानकी ठाकुर, लखनऊ, उ. प्र.
12. Ms. Rema Sukumaran, HONG KONG

-- श्री सचिन नातू, (SAT) ICCCC Member Incharge of India, Sri Lanka, UAE and Africa

### बाल-शिबिर शिक्षक

1-2. श्री देवन शाह व श्रीमती शालिनी श्रीनिवासन, ऑरोविल, तमिलनाडू
3. श्रीमती सोनल मेहता, मदुराई
4. कु. काजल मेहता, मदुराई
5. श्री के. बालचंदर, पांडिचेरी
6. श्री एम.आर.एस. विजय सुंदर, पांडिचेरी
7. श्रीमती एस. करपहवल्ली, चेन्नई
8. कु. हेमा एन. बी., बैंगलोर
9. श्री सुनील देशमुख, वर्धा
10. श्री मनोज सोनावणे, वर्धा
11. श्री राजहंस वंजारी, नागपूर
12. श्री रामदासजी भास्कर, नागपूर
13. श्री विनोद वाकडे, गोंदिया
14. श्री उमेश कांबळे, गोंदिया
15. कु. सुष्मा मेश्राम, गोंदिया
16. श्रीमती नमिता वालदे, गोंदिया
17. श्रीमती सुजाता प्रवीण गजभिये, कोल्हापूर
18. श्री सुहास भोसले, कोल्हापूर
19. श्रीमती पूनम राजुल, कोल्हापूर
20. श्रीमती मेघना आयरे, चिपळूण
21. श्रीमती सुष्मा पंडितराव हरदास, कराड
22. श्रीमती शिल्पा वासुदेव धोंगडी, कराड
23. श्रीमती संजीवनी अशोक पवार, कराड
24. कु. मोनाली शिंदे, कराड
25. श्रीमती सुवर्णा संजय भोसले, कराड
26. श्री दीपक पाटिल, कराड
27. श्री दिनेश क्षत्रिया, कराड
28. श्री चंद्रकांत हवलदार, कराड
29. श्री अरूण कोळी, कराड
30. श्रीमती अकांक्षा जाधव, रत्नागिरी
31. कु. नेहा लोणे, पुणे
32. कु. देवल कोटक, अहमदाबाद
33. श्रीमती लीलावती वाघेला, अहमदाबाद
34. श्री संदीप पटेल, अहमदाबाद
35. कु. आशा मकवाणा, अहमदाबाद
36. श्रीमती प्रविणा प्रजापति, अहमदाबाद
37. श्री कौशिक पटेल, मेहसाणा
38. कु. श्वेता राजानी, जयपुर
39. श्री राज कुमार गौतम, जयपुर
40. Ms. Pao Yeh Li, Taiwan
41. Mrs. Nuntiya Jaravechason, Thailand
42. Mr. Andrew Wong Ye Him, Hong Kong
43. Mr. Tsang Tsz Cheong (William), Hong Kong
44. Ms. Katy Hanser Switzerland
45. Ms. Inga Kuehn Germany

### New responsibility – RCCC

1. श्रीमती आशा लौंगानी, (स.आ.) उत्तरी राजस्थान की क्षेत्रीय बालशिविर समन्वयक
2. Mrs Dechen Wangmo -CCT RCCC Leh Ladakh.

## धम्माची ५० वर्षे

श्री सुराणाजींच्या मार्गदर्शनाखाली एक टीम, "धम्माची ५० वर्षे" यावर पूज्य गुरुजी आणि पूज्य माताजींशी जुडलेल्या कथानकांवर काम करीत आहे. यात आपल्यासारख्या दीर्घ काळापासून धम्माशी जुडलेल्या लोकांकडून सर्वथा शक्य असलेल्या योगदानाची आवश्यकता आहे. जर आपल्याकडे कोणता महत्वपूर्ण वार्तालाप, विशिष्ट आख्यान-उपाख्यान, फोटो, ऑडियो-विडियो इत्यादी असेल तर अवश्य पाठवा अथवा लिहून कळवा. आवश्यकतेनुसार उपयोग केला जाईल. संपर्क : रामप्रताप यादव, विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी- 422403, जिल्हा- नाशिक. WhatsApp no. 7977380198 Email: 50yearsofdhamma@vridhamma.org

## विपश्यना साधकांची धम्म-यात्रा

भारतात धम्म-आगमनाच्या ५० व्या जयंतीनिमित्त विपश्यी साधकांच्या सुविधेकरीता १००० यात्रेकरूंसाठी तीर्थ यात्रांचा एक कार्यक्रम निश्चित केला गेला आहे. ज्यांची पहिली फेरी ३१ जानेवारी २०१९ च्या रात्री मुंबईहून स्लीपर क्लास रेल्वेने वाराणसीला निघेल. १ ते ११ फेब्रुवारी पर्यंत सर्व धर्मस्थान जसे सारनाथ, बोधगया, राजगीर, नालंदा, पटना, वैशाली, श्रावस्ती, कुशीनगर, कपिलवस्तु इत्यादींची यात्रा वातानुकूलित बसने पूर्ण केली जाईल. बसचा अंतिम पडाव ११ रात्रीला गया स्टेशन असेल. गयाहून मुंबईला रेल्वे १३ ला पोहोचेल. याप्रकारे एकानंतर एक अशा यात्रा होत राहतील. यात्रेचा खर्च साधारण ४५ ते ५० हजारपर्यंत येईल. प्रत्येक ठिकाणी विहार, हॉटेल्स इत्यादी मध्ये रात्रीच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था केली जाईल. प्रमुख स्थानांवर ध्यान, गुरुजींची प्रवचन, वंदना इत्यादी कार्यक्रम होत राहील. इच्छुक व्यक्तीने अधिक माहितीसाठी व बुकींगसाठी संपर्क करावा. फोन नं. +91 7506943663.

## विश्व विपश्यना पॅगोड्यावर विशेष कार्यक्रम

या सुवर्ण-जयंती उत्सवानिमित्त विश्व विपश्यना पॅगोड्यावर २९-३० जानेवारीला विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे, ज्याविषयी विस्तृत माहिती पुढील अंकात दिली जाईल.

## एक दिवसीय शिबिर मुंबईतील पंचायतीवाडीमध्ये

३१ जानेवारीला दक्षिण मुंबईतील पांजरपोळ येथील प्रसिद्ध धर्मशाळा पंचायतीवाडीत एक दिवसाचे शिबिर होत आहे. माहिती पुढील अंकात ...

**सूचना**– काही तांत्रिक कारणांमुळे मागील दोंन अंक प्रकाशित होऊ शकले नाहीत. ह्या अंकालाच सप्टेंबर/ऑक्टोंबरचा असे मानून वाचणे. राहिलेले कार्यक्रम पण पुढच्या अंकात वाचणे. धन्यवाद!

## ग्लोबल पॅगोड्यात सन २०१८-१९ मध्ये महासंघदानाचे आणि एक दिवसाचे महाशिबिर आयोजन

**रविवार १३ जानेवारी २०१९** रोजी पूज्य माताजींची **पुण्यतिथी** (५ जानेवारी) आणि सयाजी ऊ. बा. खिन यांच्या **पुण्यतिथी** (१९ जानेवारी) निमित्त **पगोडा** परिसरात सकाळी ९.३० वाजता **बृहत संघदानाचे** आयोजन केले जात आहे. त्यानंतर ११ वाजेपासून साधक-साधिका **एक दिवसाच्या महाशिबिराचा** लाभ घेऊ शकतील. जे साधक-साधिका ह्या पुण्यवर्धन दान कार्यात भाग घेऊ इच्छितात त्यांनी कृपया खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क करावा - 1. Mr. Derik Pegado, 9921227057 or 2. sri. Bipin Mehta, Mo. 9920052156, फोन: 022- 62427512 (9.30 AM to 5.30 PM), Email: audits@globalpagoda.org

**एक दिवसीय महाशिबिर. वेळ:** सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत होईल. ३-४ वाजताच्या प्रवचनात साधना न केलेले लोकसुद्धा बसू शकतात. नाव नोंदणीसाठी कृपया निम्न फोन क्रमांक किंवा ईमेल द्वारा ताबडतोब संपर्क करा. कृपया नाव नोंदणी न करता येऊ नये. **समग्गानं तपो सुखो**- सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. **संपर्क**: 022-28451170, 022-62427544, Extn. no. 9, 82918 94644 (फोन बुकिंग 11 ते 5 वाजेपर्यंत) **Online Regn.**: www.oneday.globalpagoda.org

## दोहे धर्माचे

जाति, वर्ण अन् वर्गाचा, जेथे भेद न होय।
जो सर्वांचा सर्वांसाठी, शुद्ध धर्म रे होय॥
संप्रदाय अन् जातिचा, जेथे भेद न होय।
शुद्ध सनातन धर्म हा, वंदनीय रे होय॥
उच्च-नीच नसे च धर्म, जात-पात ना धर्म।
साम्यभाव च धर्म रे, ऐक्य भाव च धर्म॥
जाति-वर्ण नावामुळे, पसरे च अत्याचार।
सदाचार दुषित झाला, पूंजित रे मिथ्याचार॥

## दोहे धर्माचे

भाव भक्तीने भटकला, सत्य न समजू शके।
मिथ्या मन रे मृगजळ, कोसो च दौडतसे॥
हा मातीचा च पुतळा, होई रेत व राख।
जाई सोबत धर्म ही, देय परलोकी सुख॥
कित्येकांचे झाले भले, कित्येकांचे कल्याण।
धर्म सदा मंगल करी, धर्म खूप बलवान॥
धर्म-छत्र घेऊन उभा, तू का चिंतित होय।
ठेव धर्माचा आसरा, सदा मंगल च होय॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनीः (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, जी-259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2562, कार्तिक पौर्णिमा, 23 नव्हेंबर 2018

वार्षिक शुल्क रु. 30/-, US $ 10, आजीवन शुल्क रु. 500/-, US $ 100. MAHMAR/2017/72685

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**DATE OF PRINTING AND PUBLICATION: 23 NOVEMBER, 2018**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन : (02553) 244076, 244086,**
**244144, 244440.**
Email: vri_admin@dhamma.net.in;
course booking: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org